## निशाणी क्रमांक ३६ वरील आदेश

वादीने प्रस्तुतचा अर्ज तुर्तातूर्त ताकीदीसाठी दिला असून त्याचे कथन असे आहे की, मौजे पाटणसई येथील गट क्र.६८/१ ही मिळकत त्याने नोंदणीकृत खरेदीखतान्वये खरेदी केली आहे. या मिळकतीस त्याने निवासी व वाणिज्य बिनशेती परवानगी घेतली आहे. त्याने त्याच्या मालकीच्या मिळकतींची तालुका निरीक्षक भूमी अभिलेख यांच्याकडून रितसर मोजणी करून घेतली आहे व हद्दी खुणा कायम केल्या आहेत. गट क्र.६८/१ ही संपूर्णपणे त्याच्या मालकी व वहिवाटीची असून त्याच्या ताबेकब्जात आहे. असे असता वाद मिळकतीच्या पश्चिम दिशेला प्रतिवादीनी फेब्रुवारी अखेरीसपासून अचानकपणे घुसखोरी करून ४०६.३चौ.फुट क्षेत्रफळावर खड्डे खणण्यास सुरूवात केली आहे. यापूर्वी वादीने या न्यायालयात नि.क्र.५ वरील अर्ज चालविला होता. परंतू तो नामंजूर करण्यता आला आहे. त्याचा फायदा घेवून प्रतिवादी सदरचे बांधकाम पूर्ण करण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे वाद विषय बदलण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. म्हणून वादीने प्रस्तूत अर्जाद्वारे प्रतिवादीने दावा प्रलंबीत असताना सदर मिळकतीवर कोणतेही बांधकाम करू नये अशा तात्पुरत्या मनाई हुकूमाची विनंती केली आहे.

२. अर्जास प्रतिवादीने नि.क्र.४४ कडे म्हणणे दाखल करून हरकत घेतली. त्याने

म्हटले आहे की, प्रस्तूतचा अर्ज देण्यास दाव्याच्या परिस्थितीमध्ये कुठलाही बदल झालेला नाही. वादीस नि.क्र.५ वरील हुकूम अमान्य असल्यास त्याने मा. वरिष्ठ न्यायालयात दाद मागणे गरजेचे आहे. नि.क्र.५ वरील हुकूम कायम असल्याने सदरचा अर्ज बेकायदेशिर व चुकीचा आहे. त्याने पुढे म्हटले आहे की, अर्ज कलम १ मधील वाद मिळकतीचे वर्णन मोघम असून मिळकतीच्या चतुःसिमा वर्णन केलेल्या नाहीत. वाद मिळकतीचा नेमका बोध होत नाही. प्रतिवादीची मिळकत वादीच्या मिळकतीपासून दोन गट लांब अंतरावर आहे असे वादीने वाद कथनात मान्य केले आहे. त्यामुळे प्रतिवादीने वाद मिळकतीत अतिक्रमण करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. वादीने तथाकथीत अतिक्रमीत जागेबद्दल मालकी हक्क दाखविणारे कागदपत्र दाखल केले नाहीत. त्याने वाद मिळकतीमध्ये एकूण चार गट सामिल केले आहेत. पंरतू त्यापैकी नेमक्या कोणत्या गटामध्ये तथाकथीत अतिक्रमण आहे याचा उल्लेख दाव्यात अथवा अर्जामध्ये केलेला नाही. प्रतिवादीने त्याच्या स्वकष्टार्जीत मिळकतीमध्ये ग्रामपंचायतच्या परवानगीने दुरूस्ती बांधकाम केले आहे व ते पूर्णत्वास आले आहे. त्याने पूर्वीच्या अस्तित्वात असलेल्या जोत्यावर बांधकाम केले आहे.ते त्याच्या जागेत असल्याने त्याने अतिक्रमण करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. या कारणास्तव त्याने प्रस्तूतचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. उभय पक्षांच्या विद्वान विधीज्ञांचा यूक्तीवाद ऐकला. खालील मूद्दे माझ्या विचारार्थ निघत असून मी त्यांचे कारणमिमांसेसह निष्कर्ष खालीलप्रमाणे देत आहे.

| क्र. | मूद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | वादीने सकृतदर्शनी केस सिध्द केली आहे काय? | नकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल त्याच्या बाजूने झूकतो आहे काय? | नकारार्थी |
| ३. | त्याच्या लाभात तात्पूरता मनाई हूकूम पारीत न केल्यास त्याला अपरिमित हानी पोहोचेल काय? | नकारार्थी |
| ४. | काय आदेश? | ...अंतिम आदेशाप्रमाणे |

## :: कारणमिमांसा ::

### मूद्दे क्र. १ ते ३ करीता–

४. वरील मूद्दे एकमेकांशी निगडीत असल्याने त्यांची कारणमिमांसा एकत्रीतपणे करण्यात आली आहे. प्रस्तूत अर्जाद्वारे वादीचे मुख्य कथन असे आहे की, प्रतिवादीने वाद मिळकतीपैकी गट क्र.६८/१ ही मिळकत खरेदी केल्यानंतर तिची मोजणी करून घेतली असून हद्दी पूर्ण कायम केल्या आहेत. गट क्र.६८/१ ही संपूर्ण मिळकत त्याच्या वहिवाटीची असून त्याच्या ताबेकब्जात आहे. असे असता प्रतिवादीने वाद मिळकतीच्या पश्चिम दिशेला अचानकपणे घुसखोरी करून ४०६.३ चौ.फुट क्षेत्रात खड्डे खणण्यास सुरूवात केली. वादीची ही कथने विचारात घेता या अर्जात व दाव्यामध्ये एकूण चार गटांमधील मिळकत ही वाद मिळकत म्हणून समाविष्ट आहे. या अर्जातील त्याची कथने पाहता प्रतिवादीने नेमक्या कोणत्या गटाच्या पश्चिम दिशेला अतिक्रमण करून बांधकाम करण्यास सुरूवात केली हे स्पष्ट केलेले नाही. याबाबत वादीची कथने मोघम असल्यचे दिसून येते. सदर बांधकामाबाबत वादीने छायाचित्रे दाखल केली आहेत. त्यांचे

अवलोकन करता बांधकाम सुरू असल्याचे दिसून येते. परंतू ते वाद मिळकतीवरच आहे हे स्पष्ट होत नाही.

५. अभिलेखाचे अवलोकन करता वादीने दाव्यासोबत नि.क्र.५ कडे अर्ज दाखल करून प्रतिवादीने स्वतः अगर इतरांमार्फत वाद मिळकतीचे अन्य इसमाचे लाभात हस्तांतर अगर व्यवहार करू नयेत तसेच कोणत्याही प्रकारचे बांधकाम करू नयेत अशा तात्पूरत्या मनाई हुकूमाची विनंती केली होती. तो अर्ज या न्यायालयाने दि.९.५.२०१८ रोजीच्या आदेशान्वये फेटाळला होता. वस्तुतः वादीने त्या आदेशास मा. वरिष्ठ न्यायालयात आव्हान देणे आवश्यक होते. परंतू ते त्याने दिले नसल्याचे दिसून येते. नि.क्र.५ वरील अर्ज हा गुणदोषांवर आणि उभयपक्षकारांना सुनावणीची संधी देवून पारीत करण्यात आला आहे. त्यामुळे तो आदेश वादीने आव्हानीत करणे आवश्यक होते. प्रस्तूत अर्जाद्वारे त्याने पुन्हा तशीच विनंती केली आहे. त्यामुळे प्रस्तूतचा अर्ज विचारात घेणे योग्य ठरणार नाही.

६. वादीच्या कथनानुसार प्रतिवादी करीत असलेल्या बांधकामामुळे वाद विषय बदलण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. प्रतिवादीचे कथन असे आहे की, तो त्याच्या मिळकतीवर बांधकाम करत असून ती मिळकत वाद मिळकतीत असून दोन गट नंबरांच्या अंतरावर आहेत. त्यामुळे या बाबी विचारात घेता प्रतिवादी हा वाद मिळकतीवरील बांधकाम करीत आहे हे स्पष्ट होत नाही. आपल्या युक्तीवादाप्रित्यर्थ प्रतिवादीच्या वि. विधीज्ञांनी मा. कलकत्ता उच्च न्यायालयाने पारीत केलेल्या **Kishori**

**Mohan Ghosh vs. Smt. Madhabi Maurh C.O.3710 of 2015** या निकालाचा दाखला दिला आहे. त्यात मा.न्यायालयाने असा निकाल दिला आहे की, Thus, this Court is satisfied that the second application even though not barred by rest judicata but was barred being an abuse of process of this Court as similar fact was agitated in the second application like that of the first one मी सदर निकालाचे वाचन केले त्यातील तथ्ये व प्रस्तूत दाव्यातील तथ्ये समान असल्याने तो प्रस्तूत दाव्यास लागू होतो. प्रतिवादीने वाद मिळकतीवर कोणतेही बांधकाम करू नये व दावा विषय बदलेल असे कोणतेही कृत्य करू नये अशा तुर्तातूर्त मनाई हुकूमाची विनंती केली आहे. तीच विनंती त्याने नि.क्र.५ वरील अर्जात केली होती. त्यामुळे या बाबी विचारात घेता प्रस्तूतचा अर्ज मंजूर करणे योग्य ठरणार नाही. या कारणास्तव मी मुद्दे क्र. १ ते ३ चे उत्तर नकारार्थी देत मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

अर्ज (नि.क्र.३६) नामंजूर करण्यात येतो.

Digitally signed by SAMEER DILIP KAMALAKAR
Date: 2022.05.10 18:04:13 +0530

(स. दि. कमलाकर)

दिनांक :१०.०५.२०२२ दिवाणी न्यायाधीश, (क. स्तर), रोहा.